19/7/24
11:50am

# उल्हासनगर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १८/०७/२०२४

## प्रेस नोट

शासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनेनूसार १५ वा वित्त आयोग अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत आज दिनांक १८/०७/२०२४ रोजी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र- ५ अंतर्गत **"हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना"** साईबाबा मंदिर, ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-४ येथे सुरू करण्यात येत आहे. तरी सदर उद्घाटन सोहळा आज दिनांक १८/०७/२०२४ रोजी मा. उपायुक्त वैद्यकिय आरोग्य विभाग डॉ. सुभाष जाधव यांच्या शुभ हस्ते पार पाडण्यात आला. सदर सोहळ्यास माजी महापौर मा. लिलाताई आशान, वैद्यकिय आरोग्य विभागातील अधिकारी/कर्मचारी, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र- ५ येथील वैद्यकिय अधिकारी, आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविका यांच्या उपस्थितीत पार पडला.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आलेल्या **"हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना"** मार्फत शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनूसार उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांस मोफत आरोग्य सेवा पूरविण्यात येणार आहेत. यासाठी १ वैद्यकीय अधिकारी, १ स्टाफ नर्स, १ बहुउददेशिय आरोग्य कर्मचारी, १ अटेंडंट व १ स्वच्छता कर्मचारी अशी पदे मंजूर आहेत. **"हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना"** मार्फत मोफत वैद्यकिय तपासणी, मोफत औषधोपचार उपलब्ध असून प्राथमिक उपचार, गरोदर मातांची तपासणी, ० ते १६ वयोगटातील मुलांचे लसीकरण व आवश्यकतेनुसार तज्ञ सेवा उपलब्ध करुन देण्यात येतील असे मा. उप-आयुक्त साहेब यांनी सांगितले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या या महत्त्वकांक्षी योजनेचा सर्व उल्हासनगरच्या नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. तसेच वैद्यकीय आरोग्य विभागास उर्वरित **"हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना"** व **"आयुष्मान आरोग्य मंदिर- नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र"** लवकरात लवकर सुरु करणेबाबत निर्देश दिले.

18/7/24

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.